**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना**
गणेशखिंड, पुणे ४११ ००७

संदर्भ क्र. विविमं/२०२५–२६/२५३     <u>महत्वाचे व तातडीचे</u>     दिनांक : ३०/०९/२०२५

प्रति
**मा. प्राचार्य/संचालक,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय : वृक्ष लागवड मोहीमेत जून–२०२५ पासून किती व कोणत्या प्रकारची वृक्ष लागवडीची माहिती सादर करणेबाबत. (सर्व महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्थांनी ''अमृतवृक्ष'' मोबाईलमध्ये ॲप/वेब ॲपमध्ये आणि गुगल फॉर्म लिंकवर माहिती भरणे अनिवार्य आहे.)**

संदर्भ : मा. सहसंचालक उच्च शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रं. ससं/उशि/पुवि/परिपत्रक/२०२५/ ई २१९७२४६ दि. २४–०९–२०२५

महोदय/महोदया,

मा. जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली वृक्ष लागवडी संदर्भात दि. ११–०६–२०२५ रोजी बैठक घेण्यात आली आहे. त्यानुसार उच्च शिक्षण संचालनालयाकडून पुणे विभागास ५०,००० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे.

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचेकडील पत्रानुसार ५०,००० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट साध्य करण्याकरीता तसेच वृक्ष लागवड मोहीमेचे नियोजन करणे, अंमलबजावणी करणे, रोपलागवडीची माहिती अद्यावत करणे आणि संनियत्रंण करण्यासाठी आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेमध्ये नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेमध्ये नियुक्त केलेल्या नोडल अधिकाऱ्यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत शासनाने निर्देशित केले आहे.

१. आपल्या महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्थेतील आस्थापनेतील अधिकारी/कर्मचारी तसेच विद्यार्थी/विद्यार्थीनी यांच्याकडून संदर्भ क्र. ०३ नुसार दि. १८–०६–२०२४ रोजीच्या महसुल व वन विभाग, या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ०८ अन्वये वन विभागाने विकसित केलेल्या <u>**''अमृतवृक्ष'' मोबाईल ॲप/वेब ॲप डाऊनलोड**</u> करुन त्यामध्ये जून–२०२५ पासुन केलेल्या वृक्ष लागवडीची माहिती स्वेच्छेने जास्तीत जास्त प्रमाणात भरुन सबमिट करण्याबाबतची प्रत्येक नोडल अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी. (सदर माहितीचा डाटा सर्वांनी भरणे अनिवार्य)

२. आपल्या विद्यापीठात व महाविद्यालयात वृक्ष लागवड मोहीमेत जुन–२०२५ पासुन किती व कोणत्या प्रकारची वृक्ष लागवड केली याची माहिती तसेच नोडल अधिकाऱ्यांची माहिती https://forms.gle/DjcpzrpCYcjoiR118 या गुगल फॉर्म लिंकवर प्रत्येक नोडल अधिकाऱ्यांनी गुगल मराठी फॉन्ट (google Marathi Font) आणि फॉन्ट साईज १० (Font Size 10) मध्ये माहिती भरावी. (सदर माहितीचा डाटा भरणे सर्वांनी अनिवार्य)

३. तसेच विभागास देण्यात आलेले उद्दिष्टे पुर्ण करण्यासाठी आपल्या विद्यापीठात व महाविद्यालयामध्ये नियुक्ती करण्यात आलेल्या नोडल अधिकारी यांनी **''एक पेड माँ के नाम''** या योजनांअतर्गत आपल्या आस्थापनेतील आधिकारी/कर्मचारी, विद्यार्थी/विद्यार्थीनींचा तसेच नागरिकांचा उस्फूर्तपणे सहभाग घेऊन जास्तीत जास्त प्रमाणात वृक्ष लागवड मोहीमेचे उद्दिष्टे साध्य

शासन निर्देशानुसार वृक्ष लागवड मोहीमेतंर्गत आपल्या महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्थेमध्ये जून २०२५ पासून आजपर्यंत किती व कोणत्या प्रकारची वृक्ष लागवड केली याची माहिती तसेच नोडल अधिकाऱ्यांची माहिती ''अमृतवृक्ष'' मोबाईलमध्ये ॲप/वेब ॲपमध्ये आणि वरील गुगल फॉर्म लिंकवर अनिवार्यपणे भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे. तसेच जर माहिती निरंक असल्यास तसे नमूद करावे.

वृक्ष लागवड मोहिमेसंदर्भातील आपला अहवाल शासनाच्या वरील लिंकवर सादर करावयाचा असल्याने माहिती काटेकोरपणे व काळजीपूर्वक तातडीने भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे. कळावे, हि विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

(प्रा. डॉ. सदानंद भोसले)
संचालक (अतिरिक्त कार्यभार),
राष्ट्रीय सेवा योजना

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ

**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग,**
**१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१**

**Web-www.jdhepune.in** **E-mail:jdhepune@gmail.com**

फोननं. ०२०-२६१२७८३३, २६०५१६३२, फॅक्सनं. ०२०-२६१२७८३३

जा.क्र.ससं/उशि/पुवि/ परिपत्रक/२०२५/ई २१९७२४६ दि. २४-०९-२०२५

प्रति

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, सर्व अकृषि अभिमत व खाजगी विद्यापीठे/संस्था, पुणे.
३. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
४. प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित/स्वायत्त कला वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, समाजकार्य, व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,**पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा.**

**विषयः-वृक्ष लागवड मोहीमेत जुन-२०२५ पासुन किती व कोणत्या प्रकारची वृक्ष लागवडीची माहिती सादर करणेबाबत.**
**(विभागातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांनी "अमृतवक्ष" मोबाईलमध्ये ॲप/वेब ॲपमध्ये आणि गुगल फॉर्म लिंकवर माहिती भरणे अनिवार्य आहे.)**

संदर्भः-१. मा. उच्च शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रं.उशिसं/वृक्ष लागवड मो./मवि-१/२०२५/ई ऑफीस १९४०१६५, दि. १२-०९-२०२५ व दि. १८-०८-२०२९
२. मा. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे यांचेकडील पत्र जा.क्र.अ/सावनि/योजना/५००/२०२५-२६ दि. १७-०७-२०२५
३. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र. सावनि-२०२४/प्र.क्र.२९/फ-११, दि. १८-०६-२०२४

मा. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांचेकडील दि. १२-०९-२०२५ रोजीच्या पत्रासोबत मा. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे यांचेकडील दि. १७-०७-२०२५ पत्राची प्रत व दि. १८-०६-२०२४ रोजीचा महसुल व वन विभाग, शासन निर्णय सोबत जोडले आहेत. कृपया अवलोकन करावे.

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत दि. ११-०६-२०२५ रोजीच्या मा. जिल्हाधिकारी पुणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली आहे. त्यानुसार मा. उच्च शिक्षण संचालनालयाकडून आपल्या पुणे विभागास ठरवून देण्यात आलेले ५०,००० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट साध्य करण्याकरीता तसेच वृक्ष

लागवड मोहीमेचे नियोजन करणे, अंमलबजावणी करणे, रोपलागवडीची माहिती अद्यावतकरणे आणि संनियत्रंण करण्यासाठी आपल्या विद्यापीठ व महाविद्यालयामध्ये नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत कळविलेले आहे.

त्याअनुषंगानेआपल्या विद्यापीठात व महाविद्यालयांमध्ये नियुक्त केलेल्या नोडल अधिकाऱ्यांनी करावयाची कार्यवाही पुढीलप्रमाणे:

१. आपल्या विद्यापीठातील व महाविद्यालयातीलआस्थापनेतील आधिकारी/कर्मचारी तसेच विद्यार्थी/विद्यार्थीनी यांच्याकडून संदर्भ क्र. ०३ नुसार दि. १८-०६-२०२४ रोजीच्या महसुल व वन विभाग, या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ०८ अन्वये वन विभागाने विकसित केलेल्या **"अमृतवक्ष" मोबाईल ॲप/वेब ॲप डाऊनलोड** करुन त्यामध्ये जुन-२०२५ पासुन केलेल्या वृक्ष लागवडीची माहिती स्वेच्छेने जास्तीत जास्त प्रमाणात भरुन सबमिट करण्याबाबतची प्रत्येक नोडल अधिकाऱ्यांनी कार्यावाही करावी. (सदर माहितीचा डाटा सर्वांनी भरणे अनिवार्य)

२. आपल्या विद्यापीठात व महाविद्यालयात वृक्ष लागवड मोहीमेत जुन-२०२५ पासुन किती व कोणत्या प्रकारची वृक्ष लागवड केली याची माहिती तसेच नोडल अधिकाऱ्यांची माहिती https://forms.gle/DjcpzrpCYcjoiR118 **या गुगल फॉर्म लिंकवर** प्रत्येक नोडल अधिकाऱ्यांनी माहिती भरावी. (सदर माहितीचा डाटा भरणे सर्वांनी अनिवार्य)

तसेच विभागास देण्यात आलेले उद्दिष्टे पुर्ण करण्यासाठी आपल्या विद्यापीठात व महाविद्यालयामध्ये नियुक्ती करण्यात आलेल्या नोडल अधिकारी यांनी **"एक पेड माँ के नाम"** या योजनांअतर्गत आपल्या आस्थापनेतील आधिकारी/कर्मचारी, विद्यार्थी/विद्यार्थीनींचा तसेच नागरिकांचा उस्फुर्तपणे सहभाग घेऊन जास्तीत जास्त प्रमाणात वृक्ष लागवड मोहीमेचे उद्दिष्टे साध्य करावे.

**सोबत :** संदर्भिय पत्र व शासन निर्णय.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 24-09-2025
18:46:33

**(डॉ. अशोक उबाळे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

**प्रत :** मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे-१६.

# महाराष्ट्र शासन

## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,

**४१२,ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६**

**Web : www.dhepune.gov.in** **E-Mail : mavi.dhepune@gov.in**

फोन नं.०२०/२६१२२११९

क्र.उशिसं/वृक्ष लागवड मो./मवि-१/२०२५/ई ऑफीस १९४०१६५ दि. /०९/२०२५

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य

विषय:- मां. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या वृक्ष लागवड मोहीमसंदर्भातील दि.४.६.२०२५ रोजीच्या झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत.

संदर्भ:- १. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/वृक्ष लागवड मो/मवि-१/२०२५/ई १९४०१६५ दि.३.९.२०२५
२. विभागीय सहसंचालक, नागपूर विभाग यांचे पत्र क्र.उशिनाग/आस्था/मा.मंत्री/१० कोटी/वृक्ष लागवड/२३७२७११/२०२५ दि.३.९.२०२५
३. विभागीय सहसंचालक, नांदेड विभाग यांचे पत्र क्र.ससंउशिनं/पदभरती/अनु-२ २०२५-दि.३.९.२०२५
४. विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग यांचे पत्र क्र.विससं/उशि/सेविसो/२०२५/दि.३.९.२०२५
५. विभागीय सहसंचालक, जळगाव विभाग यांचे पत्र क्र.ससंउशि/जविज/वृक्ष लागवड अहवाल/२०२५ दि.८.९.२०२५
६. विभागीय सहसंचालक, मुंबई विभाग यांचे पत्र क्र.ससं/उशि/मुंवि/वृक्ष लागवड/२०२५/४९८८ दि.१०.९.२०२५

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्र.१ अन्वये, कळविल्यानुसार विभागीय सहसंचालक नागपूर, नांदेड, सोलापूर, जळगाव व मुंबई या विभागाची माहिती प्राप्त झाली असून सदर माहितीचे अवलोकन केले असता सादर केलेल्या माहितीमध्ये खालील उणिवा आहेत.

**नागपूर विभाग:-**

१. संचालनालयाच्या निर्देशानूसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडून किती वृक्ष लागवड करण्यात आली आहे? याबाबतची माहिती सादर करावी.
२. महाविद्यालयांची नावे व लागवड केलेल्या वृक्षांची संख्या याची यादी सादर करावी.
३. संचालनालयाकडून विभागीय सहसंचालक कार्यालयास ठरवून देण्यात आलेले ५०,००० वृक्ष लागवडीचे उदिष्ट विचारात घेता ८५०० संख्या अत्यल्प आहे. वृक्ष लागवडीचे उदिष्ट साध्य करण्यासाठी विशेष प्रयत्नांची गरज आहे. याबाबत आपल्या स्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. सहसंचालक कार्यालयाने विषयांकित योजनेमध्ये सक्रिय सहभागी होणे अपेक्षित आहे.

**नांदेड विभाग :-**

१. विद्यापीठ व महाविद्यालयांची माहिती स्वंतत्रपणे देण्यात यावी.
२. महाविद्यालयांची नावे व लागवड केलेल्या वृक्षांची संख्या याची यादी सादर करावी.

**सोलापूर विभागः-**

१. महाविद्यालयांची नावे व लागवड केलेल्या वृक्षांची संख्या याची यादी सादर करावी.
२. अधिकत्तर कोणत्या प्रकाराच्या झाडांची लागवड करण्यात आली आहे? याबाबत माहिती सादर करावी.

**जळगाव विभाग :-** संचालनालयाकडून विभागीय सहसंचालक कार्यालयांस ठरवून देण्यात आलेले ५०,००० वृक्ष लागवडीचे उदिष्टे विचारात घेता १२,५४० ही संख्या अत्यल्प आहे. वृक्ष लागवडीचे उदिष्ट साध्य करण्यासाठी विशेष प्रयत्नांची गरज आहे. याबाबत आपल्या स्तरावरुन आवश्क ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. सहसंचालक कार्यालयाने विषयांकित योजनेमध्ये सक्रिय सहभागी होणे अपेक्षित आहे.

**मुंबई विभागः-**

१. संचालनालयाच्या निर्देशानुसार मुंबई विद्यापीठाकडून किती वृक्ष लागवड करण्यात आली आहे? याबाबतची माहिती सादर करावी.
२. महाविद्यालयांची नावे व लागवड केलेल्या वक्षांची संख्या याची यादी सादर करावी.
३. संचालनालयाकडून विभागीय सहसंचालक कार्यालयांस ठरवून देण्यात आलेले ५०,००० वृक्ष लागवडीचे उदिष्ट विचारात घेता ३६१३ ही संख्या नगण्य ठरते. वृक्ष लागवडीचे उदिष्ट साध्य करण्यासाठी विशेष प्रयत्नांची गरज आहे. याबाबत आपल्या स्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी सहसंचालक कार्यालयाने विषयांकित योजनेमध्ये सक्रिय सहभागी होणे अपेक्षित आहे.

उर्वरित विभागीय सहसंचालक कार्यालयाची माहिती अद्यापही संचालनालयास प्राप्त झाली नसून सदर माहिती सादर करताना नेमून देण्यात आलेल्या उदिष्टानूसार किती वृक्ष लागवड केली याची संख्या तसेच शासकीय/अशासकीय/महाविद्यालय/अकृषी विद्यापीठे/अभिमत/स्वंयअर्थसहायीत विद्यापीठे/ यांमध्ये वृक्ष लागवड केली आहे याची माहिती तसेच कोणत्या प्रकाराच्या झाडांची लागवड करण्यात आली आहे? याबाबतची माहिती सादर करवी.

सदर माहिती शासनास सादर करावयाची असल्याने तात्काळ संचालनालयास सादर करावी.

Digitally signed by
SUYASH MADHUKAR DUSANE
Date: 12-09-2025 10:38:47

**(सुयश दुसाने)**
प्रशासन अधिकारी
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे - १६

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,
**४१२,ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६**

**Web :** www.dhepune.gov.in **E-Mail :** mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९

क्र.उशिसं/वृक्ष लागवड मो./मवि-१/२०२५/ई ऑफीस १९४०१६५ दि. /०८/२०२५

प्रति,
विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
पुणे विभाग पुणे.

विषयः- १० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम.

संदर्भः- १.विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे यांचे पत्र क्र.जा.क्र.अ./सावनि/योजना/५००/२०२५-२६ दि.१७.७.२०२५
२. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/वृक्ष लागवड मो/मवि-१/२०२५/ई.१९४०१६५ दि.३०.७.२०२५

विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे यांचे पत्र क्र.जा.क्र.अ./सावनि/योजना/५००/२०२५-२६ दि.१७.७.२०२५ यांच्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे. कृपया अवलोकन करावे.

उपरोक्त विषयाबाबत दि.११.६.२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी पुणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली असून सदर बैठकीमध्ये पुणे जिल्हयाकरीता १ कोटी वृक्ष लागवडीचे उदिष्ट देण्यात आले आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागास ५०,००० वृक्ष लागवडीचे उदिष्टे देण्यात आलेले असून उपरोक्त उदिष्ट साध्य करण्याकरीता आपण नेमणूक केलेल्या नोडल अधिकारी यांची माहिती विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे यांना पाठविण्यात यावी.

तसेच 'एक पेड माँ के नाम' या योजनांतअतर्गत उत्फुर्तपणे सहभाग घेऊन उच्च व तंत्र शिक्षण विभागास देण्यात आलेले उदिष्टे पुर्ण करण्याकरीता आपल्या स्तरावरुन सर्व संलग्नित महाविद्यालये/ शैक्षणिक संस्था यांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे. व केलल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

Digitally signed by
PRAKASH DHONDU BACHHAV
Date: 18-08-2025 12:41:54

**(डॉ.प्रकाश बच्छाव)**
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

**प्रतः- माहितीस्तव -** विभागीय वन अधिकारी, सामजिक वनीकरण विभाग पुणे, सर्व्हे न४९/फॉरेस्ट कॉलनी, नरेन हिल सौ. समोर साळुखे विहार, वानवडी पुणे ४११०२२

# महाराष्ट्र शासन वन विभाग

**विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे, यांचे कार्यालय**
**सर्व्हे नं ४९/फॉरेस्ट कॉलनी, नरेन हिल सो.समोर साळुखे विहार, वानवडी पुणे-४११०२२.**
**दुरध्वनी क्र. ०२०-२९८०७५११ E-Mail - dydirsfdpune@gmail.com**

विषय:- १० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम
जा.क्र.अ/ सावि/योजना/ 500 / 2025-26
पुणे - 411022 दि. 17 .07.2025

प्रति,

१) रेशिम विकास अधिकारी, पुणे
२) उप वनसंरक्षक (प्रा) पुणे
३) उप वनसंरक्षक (प्रा जुन्नर
४) सामाजिक वनीकरण विभाग, पुणे
५) कृषि / फलोत्पादन विभाग पुणे
६) ग्रामविकास विभाग
७) नगर विकास विभाग पुणे
८) शालेय शिक्षण विभाग पुणे
९) सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे
१०) जलसंपदा विभाग पुणे
११) महसलु विभाग पुणे
१२) उद्योग विभाग पुणे
१३) गृह विभाग पुणे
१४) उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग पुणे
१५) सहकार व पणन विभाग मध्यवर्ती इमारत पूणे
१६) सार्वजनिक अरोग्य विभाग पुणे
१७) उर्जा विभाग पुणे
१८) आदिवाशी विकास विभाग, पुणे
१९) पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय मत्स वि. पुणे
२०) महिला शिक्षण औषधी द्रव्ये वि.
२१) वैद्यकीय शिक्षण विभाग पुणे
२२) पर्यटन विकास महामंडळ विभाग मध्यवर्ती इमारत, पुणे
२३) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ
२४) राष्ट्रीय विकास महामार्ग प्राधिकरण पुणे
२५) रेल्वे विभाग पुणे
२६) संरक्षण (डिफेन्स) विभाग खडकी, पुणे

संदर्भ:- 1) शासन निर्णय क्रमांक: सावि-२०२५/प्र.क्र.२८/फ-११ दि.११ जून २०२५
2) या कार्यालयाचे पत्र क्र. जा.क्र अ/ सावि/ योजना/193/25-26 दि. 07/07/2025
3) जिल्हाधिकारी कार्यालय (रोहयो) यांचेकडील पत्रक्र. जा.क्र रोहयो / ४३७ / दिनांक १०/०६/२०२५ च्या इत्तिवृत्तानुसार.

विषयांकित प्रकरणी राज्यात वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी " हरित महाराष्ट्र " या अभियानांतर्गत वर्ष २०२५ करिता 10 कोटी वृक्ष लागवड मोहिम लोक चळवळ म्हणुन राबविण्याबाबत मा. मुख्य मंत्री महोदयांनी दि. ०४.०६.२०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये निर्देशित केले आहे.

दि. 11 / 06 /2025 रोजी मा. जिल्हाधिकारी पुणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली व पुणे जिल्हयाकरिता 1 कोटी वृक्ष लागवड करण्याचे सोबत दिलेल्या विहित प्रपत्राप्रमाणे उद्दिष्ट वाटप करण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दि. ११ जून रोजी झालेल्या बैठकीदरम्यान

जिल्हयाकरिता १ कोटी उद्दिष्ट घेण्यात आले व त्याप्रमाणे सर्व यंत्रणांचे उद्दिष्ट वाटप करण्यात आले उद्दिष्टाप्रमाणे सन २०२५ च्या पावसाळयामध्ये लागवड करण्याचे नियोजन संबंधित विभागाने करावे.

उपरोक्त वृक्ष लागवड उद्दिष्टा करिता आपले कार्यालयातर्फे नोडल ऑफिसरची नेमणूक करुन त्याचां संपर्क क्रमांक या कार्यालयास देण्यात यावा जेणेकरुन त्यांचेशी संपर्क साधने सोईचे होईल. तसेच ' एक पेड माँ के नाम ' या योजनांअतर्गत उस्फुर्तपणे भाग घेऊन उद्दिष्ट पुर्ण करावे.

सोबत- सहपत्र वरिल प्रमाणे

(आशा भोंग)
विभागीय वन अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग, पुणे

प्रतिलिपी- विभागीय आयुक्त, महसुल विभाग पुणे/ मुख्य वनसंरक्षक (प्रा) पुणे यांना इतिवृत्ताचे प्रतीसह माहितीसाठी सविनय सादर

प्रतिलिपी- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना इतिवृत्ताचे प्रतीसह माहितीसाठी सविनय सादर

प्रतिलिपी- उप वनंसरक्षक, पुणे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर

प्रतिलिपी- उपजिल्हाधिकारी (रोहयो), पुणे तथा नोडल अधिकारी, पुणे जिल्हा वृक्ष लागवड समिती/ उपप्रमुख कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जि.प. पुणे यांना इतिवृत्ताचे प्रतीसह माहितीसाठी सविनय सादर

प्रतिलिपी- सर्व यंत्रणा प्रमुख/ विभाग प्रमुख यांना इतिवृत्ताचे प्रतिसह माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सन्सेह अग्रेषित

| सन २०२५-२६ मध्ये १० कोटी वृक्ष लागवड | | |
|---|---|---|
| अ.क्र | विभाग | वृक्ष लागवड संख्या |
| १ | रेशीम लागवड | 20,00,000 |
| २ | वनविभाग प्रा. पुणे | 20,00,000 |
| ३ | वनविभाग प्रा. जुन्नर | 12,00,000 |
| ४ | वनविभाग सा.व. पुणे | 8,00,000 |
| ५ | कृषि/ फालोत्पादन विभाग | 10,00,000 |
| ६ | ग्रामविकास विभाग | 10,00,000 |
| ७ | नगर विकास विभाग | 8,40,000 |
| ८ | शालेय शिक्षण विभाग | 5,00,000 |
| ९ | सार्वजनिक बांधकाम विभाग | 1,50,000 |
| १० | जलसंपदा विभाग | 50,000 |
| ११ | महसुल विभाग | 50,000 |
| १२ | उद्योग विभाग | 50,000 |
| १३ | गृह विभाग | 50,000 |
| १४ | उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग | 50,000 |
| १५ | सहकार पणन | 20,000 |
| १६ | सार्वजनिक अरोग्य विभाग | 20,000 |
| १७ | उर्जा विभाग | 30,000 |
| १८ | आदिवाशी विकास विभाग | 20,000 |
| १९ | पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय मत्स वि. | 500 |
| २० | महिला शिक्षण औषधी द्रव्य वि. | 20,000 |
| २१ | वैद्यकीय शिक्षण | 20,000 |
| २२ | पर्यटन विभाग | 10,000 |
| २३ | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ | 1,00000 |
| २४ | राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण | 1,00000 |
| २५ | रेल्वे विभाग | 1,00000 |
| २६ | संरक्षण (डिफेन्स) विभाग | 50,000 |

**(आशा भोंग)**
विभागीय वन अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग, पुणे

वन महोत्सव २०२४-२५

**वन महोत्सव कालावधीत "अमृतवृक्ष आपल्या दारी" ही योजना राबविण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्र. साववि- २०२४/ प्र.क्र. २९/ फ-११,**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- १८ जून, २०२४

वाचा:-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. वनम २०१६/प्र.क्र.७१/फ-११ दि. ४.६.२०१६.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. साववि २०२१/प्र.क्र.२०/फ-११ दि.४.०६.२०२१.
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. साववि २०२२/प्र.क्र.३४/फ-११ दि.२०.०६.२०२२.
४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. साववि २०२३/प्र.क्र.४४/फ-११ दि.२८.०६.२०२३.
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र जा.क्र. कक्ष १/पी/यो/नबाप्र/प्र.क्र.१५/१८९/२०२४-२५ दि. ११.०६.२०२३.

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय वननीती १९८८ नुसार पर्यावरण समतोल राखण्यासाठी एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के भूभाग वनाच्छादित असणे आवश्यक आहे. तथापि महाराष्ट्र राज्यामध्ये तुलनात्मकदृष्टया हे प्रमाण कमी आहे. मोठ्या प्रमाणात शहरीकरण व औद्योगिकरणामुळे वातावरण बदल होऊन जागतिक तापमान वाढ होत आहे. या समस्यांवर मात करण्यासाठी आणि प्रदेशाचे नैसर्गिक सौंदर्य टिकवण्यासाठी वृक्षारोपण मोहिमेला अत्यंत महत्त्व आहे. महाराष्ट्र राज्य हरितीकरणाच्या विविध योजना राबवून राज्याचे हरित आच्छादन वाढविण्यामध्ये आणि देशाच्या वन धोरणाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्याच्या प्रयत्नांमध्ये अग्रेसर आहे. राज्याने यापूर्वी ५० कोटी वृक्ष लागवड, बेल वन, अमृत वन, पंचायतन वन अशा योजनांच्या माध्यमातून वनीकरणासोबतच लोकसहभाग वाढविण्याचा आणि जनपरंपरांचा आधार घेऊन वन आणि वृक्ष संवर्धनाचा प्रयत्न केला आहे. दिनांक १५ जून ते ३० सप्टेंबर हा काळ वन महोत्सवाचा काळ म्हणून दरवर्षी साजरा करण्यात येतो. या कालावधीत वृक्ष लागवडीसाठी लोकांना उद्युक्त करण्याच्या दृष्टीने शासनामार्फत सवलतीच्या दराने रोपांचा पुरवठा करण्यात येत असतो. याव्यतिरिक्त केंद्र शासनाकडून अलिकडेच **"एक पेड माँ के नाम - Plant4Mother"** ही संकल्पना राबविणेबाबत सुचना प्राप्त झालेल्या आहेत.

१५ ऑगस्ट २०२२ मध्ये आपल्या स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण झाली असून अमृतकाळ सुरू झालेला आहे. महाराष्ट्र राज्याने सुरू केलेली हरित चळवळ अधिक लोकाभिमुख व्हावी, आणि प्रत्येकाचा यात सहभाग मिळावा तसेच येणाऱ्या काळात पर्यावरणाचे संवर्धन व्हावे या हेतूने वर्ष २०२४ मध्ये महाराष्ट्र वनविभागामार्फत वनमहोत्सव काळात "अमृतवृक्ष आपल्या दारी" योजना संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे. सदर योजनेद्वारे प्रत्येक नागरिकास अमृत वृक्ष लागवडीच्या चळवळीमध्ये सहभाग घेता येऊ शकेल व पर्यावरण संवर्धनामध्ये सहभागी होता येईल.

## शासन निर्णयः-

केंद्र शासनाच्या “एक पेड माँ के नाम - Plant4Mother” योजनेची देखील पूर्तता व्हावी तसेच राज्याने यापूर्वी अवलंबिलेले वृक्ष लागवडीचे धोरण अखंडपणे पुढेही चालू राहावे आणि या कार्यक्रमांतर्गत शासकीय तसेच खाजगी मालकीचे पडीक क्षेत्र आणि शेत बांधावर, रेल्वे दुतर्फा, कालवा दुतर्फा तसेच रस्ता दुतर्फा क्षेत्रात, सामुहिक पडीक क्षेत्र व गायरान क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेता यावा तसेच सर्वसामान्य शेतकरी व वृक्षप्रेमी यांना माफक दरात रोपे उपलब्ध व्हावीत यासाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात वन महोत्सवाच्या कालावधीत “अमृतवृक्ष आपल्या दारी” योजना राबविण्याच्या उद्देशाने तसेच त्यानंतरच्या सर्वसाधारण कालावधीत खाली नमूद केलेल्या सवलतीच्या दराप्रमाणे रोपांचा पुरवठा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | रोपांचे वर्गीकरण | रोपांची प्रतवारी | वन महोत्सव कालावधीतील रोप विक्रीचे दर प्रति रोप (रुपये) | सर्वसाधारण कालावधीत प्रति रोपाचा दर (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | ९ महिन्यांचे सर्वसाधारण प्रजातीचे रोप | A | २१ | ३३ |
| | | B | १३ | २६ |
| | | C | ११ | २४ |
| २ | १८ महिन्यांचे व त्यावरील सर्वसाधारण प्रजातीचे रोप | A | ५३ | ८३ |
| | | B | ३२ | ६७ |
| | | C | २६ | ६० |
| ३ | बांबू कंद | A | ८ | १७ |
| | | B | ६ | १२ |
| ४ | १५ महिन्यांचे पिशवीतील बांबू रोप | A | १३ | २५ |
| | | B | ९ | १८ |

२. ज्या शासकीय यंत्रणांना/स्थानिक स्वराज्य संस्थांना वृक्ष लागवड करावयाची आहे व त्यांच्याकडे जागा उपलब्ध आहे मात्र त्यांच्याकडे रोप निर्मितीसाठी कोणत्याही प्रकारची आर्थिक तरतूद उपलब्ध नाही, अशा यंत्रणांना या वन महोत्सव कालावधीत उपलब्ध जागेच्या प्रमाणात वृक्षलागवड करणेसाठी आवश्यक रोपांचा मोफत पुरवठा नजिकच्या रोपवाटिकेतून रोपांच्या उपलब्धतेनुसार केला जाईल. याव्यतिरिक्त वनीकरणाच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या अनुभवी अशासकीय संस्थांना शासकीय जमिनीवर (वनेत्तर) वृक्षलागवड करावयाची असल्यास त्यांनी आवश्यक असलेल्या रोपांची मागणी संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मार्फत केल्यास त्यांना देखील रोपांचा मोफत पुरवठा उपलब्धतेनुसार करण्यात येईल.

३. वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनाचे संस्कार विद्यार्थ्यांवर होणेकरिता व या कार्यात त्यांचा अधिकाअधिक सहभाग मिळवण्याकरिता आणि अशा शाळा व महाविद्यालयांच्या परिसरांभोवती संरक्षक भिंती असल्याने रोपांचे संरक्षण व संवर्धन होणे सोयीचे असल्याने वृक्ष लागवड करू इच्छिणारी शाळा/ विद्यालय/ महाविद्यालय यांनी रोपांची मागणी केल्यास त्यांना वन महोत्सव कालावधीत मागणीनुसार मोफत रोपांचा पुरवठा उपलब्धतेनुसार करण्यात येईल.

४. पोलिस, संरक्षण बल यांच्याकडे मोठ्या प्रमाणात क्षेत्र व मनुष्यबळ उपलब्ध असते. संरक्षण बलाकडील क्षेत्र हे संरक्षित असल्यामुळे तिथे लावलेल्या रोपांच्या संवर्धनाची हमी असते. तथापि, त्यांच्याकडे वनीकरणासाठी सामान्यत: आर्थिक तरतूद नसते. त्यामुळे केंद्र व राज्य शासनाच्या संरक्षण बलांना वनमहोत्सव कालावधीत उपलब्ध जागेनुसार वृक्षलागवड करणेसाठी रोपांचा मोफत पुरवठा नजिकच्या रोपवाटिकेतून केला जाईल. तसेच संरक्षण बल यांची मागणी असल्यास व शासकीय रोपवाटिकेत रोपे उपलब्ध असल्यास वन महोत्सव कालावधी व्यतिरिक्त सर्वसाधारण कालावधीमध्ये देखील सदरील तरतूद लागू राहील.

५. उपरोक्तप्रमाणे यंत्रणा/संस्था यांना लागणाऱ्या रोपांची आगाऊ मागणी लगतचे उपवनसंरक्षक (प्रादेशिक) किंवा विभागीय वन अधिकारी, (सामाजिक वनीकरण विभाग) यांचेकडे सोबतच्या मागणी पत्राद्वारे करावी. रोपाची उचल करून वाहतूकीसाठी होणारा खर्च संबंधित यंत्रणा/संस्थेने करावा. सदर यंत्रणा/संस्थांनी पुरवठा करण्यात आलेल्या रोपांच्या लागवडीची माहिती संबंधित विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण / उप वन संरक्षक, प्रादेशिक यांचेकडे देणे बंधनकारक राहील. लागवड केलेल्या रोपांचे Geo Tagging करून पुढील ३ वर्षापर्यंत जिवंत रोपांची टक्केवारी (ऑक्टोबर / मे) या कालावधीत घेऊन संबंधीत यंत्रणेने त्याची नोंद त्यांच्याकडील नोंदवहित ठेवावी.

६. वन महोत्सव कालावधीत “अमृतवृक्ष आपल्या दारी” हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी व जास्तीत जास्त लोकांना सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी शहरी भागात मागणीनुसार वनमहोत्सव केंद्र (कमाल १० पर्यंत) १५ जून, २०२४ ते १५ ऑगस्ट, २०२४ पर्यंत शासकीय कार्यालयाच्या आवारात उघडून त्याद्वारे रोपे पुरवठा करण्यात यावा. यासाठी उपवनसंरक्षक (प्रादेशिक) व विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण विभाग) यांनी समन्वय साधून वनमहोत्सव केंद्र उघडण्यासाठी कार्यवाही करावी.

७. वन महोत्सवाच्या कालावधीत (दिनांक १५ जून ते ३० सप्टेंबर) “अमृतवृक्ष आपल्या दारी” योजनेचे व वन महोत्सवाचे प्रयोजन व महत्व याबाबत प्रभावीपणे सर्वदूर पोहोचणाऱ्या माध्यमातून जिल्हा माहिती अधिकारी /विभागाचे Social Media Handles/ विभागाची Website यांचेमार्फत योग्य प्रसिद्धी करण्यात यावी.

८. अमृतवृक्ष योजनेत लागवड केलेल्या रोपांची माहिती शासकीय यंत्रणा/शाळा/महाविद्यालये /नागरिक यांनी वन विभागाच्या विकसित केलेल्या - **“अमृतवृक्ष”** मोबाईल ॲप / वेब ॲप मध्ये स्वेच्छेने भरण्यास आवाहन करण्यात येत आहे. मोफत पुरवठा केलेल्या रोपांची माहिती संबंधित शासकीय यंत्रणेने सदर ॲपवर भरणे आवश्यक आहे.

९. वनमहोत्सव योजनेंतर्गत उपरोक्त नमूद केल्यानुसार दिनांक १५ जून ते ३० सप्टेंबर या वनमहोत्सव कालावधीत मोफत रोपे वाटप, सवलतीच्या दराने वाटप करणे, “अमृत वृक्ष आपल्या दारी” या उपक्रमांतर्गत रोपे वाटप करणे व सदर योजनेच्या प्रसिध्दीकरीता होणारा खर्च मागणी क्रमांक सी-७, मुख्य लेखाशिर्ष-२४०६ वनीकरण व वन्यजीव-१०१-वन संरक्षण व विकास व पुनर्निर्मिती-(११)(३४)(२४०६ ८५५१) (कार्यक्रम) या लेखाशिर्षाखाली सन २०२४-२५ या वर्षात मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

१०. उपवनसंरक्षक (प्रादेशिक), विभागीय वन अधिकारी, (सामाजिक वनीकरण) यांनी विक्रीतून एकूण जमा झालेला महसूल बाबत चालू आर्थिक वर्षाचा तपशील सोबतच्या विहित नमुन्यात प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करावा.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४०६१८१४५४१६१६१९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

INGALE VINAYAK BALASAHEB

Digitally signed by INGALE VINAYAK BALASAHEB
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=4282a00b0a0507f339edd9409eebc43f466c57e6ec219f022cb4d8e9d79999ec, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B9DD74802C0E9E87CDD582D1AEA8DC4506C60DEA869DFE0B71557BF4A56623D7, cn=INGALE VINAYAK BALASAHEB
Date: 2024.06.18 15:11:07 +05'30'

**( वि. बा. इंगळे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४) विभागीय आयुक्त सर्व
५) मुख्य वनसंरक्षक/ वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व
६) वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त पुणे / ठाणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर
७) जिल्हाधिकारी सर्व
८) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सर्व
९) उपवनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व
१०) आयुक्त महानगरपालिका सर्व
११) विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग (सर्व)
१२) विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) सर्व
१३) सहसंचालक (कृषी), सर्व
१४) जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी सर्व
१५) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
१६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर
१७) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
१८) अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई.
१९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२०) कार्यासन अधिकारी, व्यय- ०६/अर्थ- १७, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२
२१) कार्यासन अधिकारी, ब-१ महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई- ३२
२२) अवर सचिव, फ- २, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२
२३) निवडनस्ती / फ- ११

## शासन निर्णय क्र. सावि-२०२४/ प्र. क्र. २९/ फ-११

**शासकीय /निमशासकीय विभाग /स्थानिक स्वराज्य संस्था/ शाळा / विद्यालय / महाविद्यालय / संरक्षण बल यांचेकरीता रोपे मागणी पत्र / अर्ज**

प्रति,

उपवनसंरक्षक (प्रादेशिक)/ विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण)

....................जिल्हा

विषय: मोफत रोपांचा पुरवठा होणेबाबत.

महोदय,

मी .................................................................................... पदनाम ...................... ....................... विभाग / शाळा / विद्यालय / महाविद्यालय .....................................प्रमाणित करतो की, शासन निर्णयानुसार वृक्ष लागवडीसाठी आमच्या ................ एवढ्या ठिकाणी ........... एवढे खड्डे खोदुन ठेवलेले आहेत. तरी वृक्ष लागवडीसाठी ................ रोपांची गरज आहे.

१) सदर रोपे शासकीय दरात घेण्याकरिता आमच्या यंत्रणेजवळ रोप लागवडीकरिता अनुदान उपलब्ध नाही.
२) सदर रोपे खरेदी करिता आम्ही/ इतर स्त्रोतातून प्रयत्न केला परंतु निधी उपलब्ध झालेला नाही.
३) आमच्याकडे कार्यालय खर्च व इतर किरकोळ खर्चाकरिता सुद्धा अनुदान उपलब्ध नाही.

करिता आम्हाला लागणारी.......................... रोपे मोफत उपलब्ध करून देण्यात यावीत, ही विनंती. सदरची रोपे ही आमच्याकडे उपलब्ध जागेवर लावण्यात येतील. तसेच लागवड केलेल्या रोपांचे Geo Tagging करून पुढील ३ वर्षापर्यंत जीवंत रोपांची टक्केवारी (Oct/May) घेऊन नोंदवहीमध्ये नोंद घेतली जाईल.

दिनांक आपला,

स्थान सही.........

नाव.........

पदनाम.......

जिल्हा........

**शासन निर्णय क्र. साववि-२०२४/ प्र. क्र. २९/ फ-११**

महसूल व वन विभाग

क्रमांक:-साववि- २०२४/प्र. क्र.२९ /फ-११, दिनांक १८.०६.२०२४ सोबतचे विवरणपत्र

| अ.क्र. | तयार करण्यात आलेल्या एकूण रोपांची संख्या (लाखात) | एकूण विक्री झालेल्या रोपांची संख्या (लाखात) | विक्रीतून वसूल झालेली रक्कम (रुपये हजारात) | शिल्लक राहिलेल्या रोपांची संख्या (लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

उप वनसंरक्षक (प्रादेशिक) / विभागीय वन अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग,
जिल्हा .............